पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. १४/३/२०१८

पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र. २७ (पुरवणी)
मार्च २०१८

मंगळवार, दि.२० मार्च २०१८ रोजी दुपारी ३–०० (तीन) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावाची सूचना (नोटीस) मा.सभासदाकडून आली आहे.

:– मा. सभासदांचे प्रस्ताव –:

विषय क्र.१०७५

माहे मार्च २०१८ ते माहे मे २०१८ या कालावधीत रजा मिळणेबाबत मा.डॉ.सौ.श्रध्दा प्रभुणे यांचे दि.१/३/२०१८ चे पत्र.

विषय क्र.१०७६

**संदर्भ –** मा.रविंद्र धंगेकर व मा.सौ.पल्लवी जावळे यांची सूचना दि.५/३/२०१८
१) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं. मआ/अनअ(प्रकल्प)/११४७, दि. २८/१२/२०११ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५८ दि. १९/६/२०१२
----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

रास्ता पेठ मार्केट सि.स.नं. ३८८/अ, ३८८/ब/१, ३८८/ब/२ बी.ओ.टी. तत्वावर विकसित करणे कामी निविदा मागविल्या असता विकसक महेंद्र रियल्टर्स ॲण्ड इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांची एकच निविदा आली असल्याने त्यांचेकडून मा.महा.आयुक्त यांचे विषय पत्रात नमूद केलेल्या अटी व टेंडर अटी/शर्तींसह ३० वर्षे कालावधीकरीता व मे.महाराष्ट्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यास ९९ वर्षे कालावधीकरीता सर्वात जास्त प्रिमियम देवू केलेले विकसक महेंद्र रियल्टर्स ॲण्ड इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून विकसित करण्यासाठी त्यांची र.रुपये २६,००,०००/– प्रिमियम देवू केलेली निविदा मान्य करणेस आणि टेंडर अटी व शर्तींनुसार अनुषंगिक करारनामा विकसकाशी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र. २२०, दिनांक २१/८/२०१२ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्रं. मआ/अनअ(प्रकल्प)/११४७, दि. २८/१२/२०११ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५८ दि. १९/६/२०१२
---

मनपा ठराव क्र. २२०, दिनांक २१/८/२०१२ अन्वये रास्ता पेठ मार्केट सि.स.नं. ३८८/अ, ३८८/ब/१, ३८८/ब/२ बी.ओ.टी. तत्वावर विकसित करणेबाबतचा ठराव मान्य करणेत आलेला आहे. परंतु त्यांच्या अटी व शर्तीप्रमाणे मनपाला देवू केलेले क्षेत्र हे नवीन डी.पी.प्रमाणे अत्यंत कमी प्रमाणात बसत आहे. त्यामुळे विकसक हा ठरावाप्रमाणे क्षेत्र मनपाला देवू शकत नाही. त्यामुळे या ठरावाच्या नियम व अटीत पूर्णपणे बदल होत असल्यामुळे मनपाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणार असल्याने सदरचा ठराव दप्तरी दाखल करण्यात यावा.

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि. १४/३/२०१८

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत)